www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा – २०१८

# A

परीक्षा दि. २४ सप्टेंबर २०१८

2014

CODE : **EO5**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

## प्रश्नपुस्तिका
## मराठी व इंग्रजी

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
केंद्राची संकेताक्षरे ↑ ... ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**
**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



1. कर्णापासून कान यासारख्या शब्दांना काय म्हणतात ?

(1) तत्सम शब्द (2) देशी शब्द (3) तद्‌भव शब्द (4) परभाषीय शब्द

2. 'हलाहल' या शब्दाचा अर्थ काय ?

(1) अमृत (2) विष (3) हाल (4) नांगर

3. पुढील वाक्यातील विधेय विस्तार ओळखा.

'आमचा छोटा मुलगा काल विकत घेतलेले पुस्तक अगदी तन्मयतेने वाचीत बसला आहे.'

(1) वाचीत बसला आहे (2) विकत घेतलेले

(3) अगदी तन्मयतेने (4) छोटा मुलगा

4. पुढीलपैकी कानडी शब्द कोणते ?

(1) दादर, डबा, रिकामटेकडा (2) ताई, भाकरी, तूप

(3) ताळा, अनरसा, शिकेकाई (4) तपास, दाम, करोड

5. एकाच आईच्या पोटी ज्यांचा जन्म झाला आहे असे :

(1) सहोदर (2) आप्तेष्ट (3) गणगोत (4) आप्तस्वकीय

6. पुढीलपैकी व्याकरणदृष्ट्या चुकीचा शब्द ओळखा :

(1) उत्स्फूर्त (2) उन्मूलन (3) उत्तूंग (4) उत्सृष्ट

7. पुढीलपैकी तद्‌भव शब्द ओळखा :

(1) कर (2) जल (3) घाम (4) हस्त

कच्च्या कामासाठी जागा / *SPACE FOR ROUGH WORK*

P.T.O.

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



8. योग्य जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | आज्ञार्थी | (i) | मुलांनी वडिलांची आज्ञा पाळावी |
| (b) | विध्यर्थी | (ii) | मुलांनो चांगला अभ्यास करा |
| (c) | संकेतार्थी | (iii) | अबब! केवढी प्रचंड आग ही! |
| (d) | उद्गार्थी | (iv) | पाऊस पडला तर हवेत गारवा आला असता |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

9. ताळा, अनरसा, किडूक मिडूक, शिकेकाई हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले आहेत?

(1) मराठी (2) हिंदी (3) गुजराती (4) तेलगू

10. पुढीलपैकी 'करणरूपी' वाक्य कोणते?

(1) अबब! केवढी प्रचंड आग ही! (2) माझे वडील आज परगावी गेले
(3) गोविंदा अभ्यास करतो (4) जे चकाकते, ते सोने नसते

11. खालीलपैकी शुद्ध शब्द ओळखा :

(1) लुटूपुटू (2) लुटुपुटु (3) लूटूपूटू (4) लुटूपूटू

12. 'मागून जन्मलेला' या शब्दाला समूहदर्शक शब्द निवडा :

(1) अग्रज (2) अपूर्व (3) अनुज (4) अष्टावधानी

13. खालीलपैकी कोणता शब्द पोर्तुगीज भाषेतून आला आहे?

(1) हापूस (2) अर्ज (3) सामान (4) अण्णा

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



14. योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | दात दाखवणे | (i) | फजिता होणे |
| (b) | दात वासणे | (ii) | एखाद्याची टिंगल करून हसणे |
| (c) | दात विचकणे | (iii) | नुकसानीमुळे खिन्न होवून बसणे |
| (d) | दात पडणे | (iv) | एखाद्याला वेडावणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

15. खालीलपैकी उपसर्गघटीत शब्द ओळखा :

(1) लेखक (2) टाकाऊ (3) अतिशय (4) आनंदित

16. 'पाणि' या शब्दाचा अर्थ –

(1) पेय पदार्थ (2) हात (3) पाणिनी (4) जल

17. अयोग्य जोडी निवडा.

(1) अनल-अग्नी (2) कमाल-किमान (3) मित्र-शत्रू (4) क्षर-अक्षर

18. सरदार, बिनचूक, वेदना, भरजरी या चार शब्दांपैकी कोणता शब्द उपसर्गघटित शब्द नाही ?

(1) सरदार (2) बिनचूक (3) वेदना (4) भरजरी

19. <u>मधूनमधून</u> असेच घराकडे येत जा. या वाक्यातील अधोरेखीत शब्द कोणत्या प्रकारात मोडतो ?

(1) पूर्णाभ्यस्त शब्द (2) अंशाभ्यस्त शब्द (3) अनुकरणवाचक शब्द (4) यापैकी नाही

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



**20.** खालील वाक्याचे केवल वाक्य करा :

'जे लोक बुद्धिमंत असतात ते यशस्वी होतात.'

(1) बुद्धिमान लोक यशस्वी होतातच असे नाही.

(2) बुद्धिमंत लोक यशस्वी होतात.

(3) बुद्धिमान असतात म्हणून लोक यशस्वी होतात.

(4) बुद्धिमंत यशस्वी होतातच असे नाही.

---

**21.** 'शरदाच्या चांदण्यात गुलमोहर मोहक दिसतो'. या वाक्यातील विधेयविस्तार __________ हा आहे.

(1) शरदाच्या चांदण्यात (2) गुलमोहर

(3) मोहक (4) दिसतो

---

**22.** पुढीलपैकी ऊष्म वर्ण ओळखा :

(1) अ, आ (2) ह (3) श, ष, स (4) क, ख, ग

---

**23.** त्या आजारी माणसाला आता थोडे <u>बसवते</u>. या वाक्यातील अधोरेखीत शब्द कोणते क्रियापद आहे ?

(1) प्रायोजक क्रियापद (2) शक्य क्रियापद

(3) अनियमीत क्रियापद (4) गौण क्रियापद

---

**24.** पुढीलपैकी फारशी व अरबी उपसर्ग असणारे शब्द कोणते ?

(1) पडसाद, फटकळ, भरजरी (2) कमजोर, गैरसोय, दरमहा

(3) उपवास, उद्योग, आकर्ण (4) प्रबल, विज्ञान, संगम

---

**25.** योग्य शब्दार्थाच्या जोड्या जुळवा :

(a) नदी (i) शैल

(b) पर्वत (ii) अंबू

(c) पाणी (iii) तरंगिणी

(d) पृथ्वी (iv) क्षमा

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



26. पुढीलपैकी फारसी प्रत्यय लागून तयार झालेला तद्धित शब्द कोणता ?

(1) सावकारी (2) पहारेकरी (3) मजुरी (4) मासलेवाईक

27. 'तो गाणे गातो' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) भावे (2) कर्मणी (3) कोणताही नाही (4) कर्तरी

28. पुढीलपैकी कंठाजवळ उच्चार कोणत्या वर्गाचा होतो ?

(1) प - वर्ग (2) क - वर्ग (3) त - वर्ग (4) ट - वर्ग

29. पुढीलपैकी विध्यर्थी वाक्य ओळखा :

(1) मुले घरी गेली
(2) पाऊस पडला तर हवेत गारवा आला असता
(3) मुलांनो, चांगला अभ्यास करा
(4) मला परीक्षेत पहिला वर्ग मिळावा

30. (i) तानाजी लढता लढता मेला.

(ii) आकाशात जेव्हा ढग जमतात तेव्हा मोर नाचू लागतो.

(iii) मी रोज सकाळी पहाटे उठतो व एक तासभर शाळेचा अभ्यास करतो.

(iv) मुलांनी वडिलांची आज्ञा पाळावी.

(a) विधान नं. (i) केवल वाक्याचे उदाहरण आहे.

(b) विधान नं. (ii) संयुक्त वाक्याचे उदाहरण आहे.

(c) विधान नं. (iii) मिश्र वाक्याचे उदाहरण आहे.

(d) विधान नं. (iv) आज्ञार्थी वाक्याचे उदाहरण आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) बरोबर
(2) फक्त (c) बरोबर
(3) फक्त (a) बरोबर
(4) फक्त (d) चूक

31. खालीलपैकी प्रत्ययघटीत शब्द ओळखा :

(1) फटफजिती (2) सरकार (3) हररोज (4) रमणीय

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



32. खालीलपैकी कानडी शब्द ओळखा :

(1) सार (2) चिलापिली (3) किल्ली (4) रिकामटेकडा

33. खालील शब्द कोणत्या शब्दसिद्धीतील आहे ?

'भरदिवसा'

(1) उपसर्गघटित शब्द (2) प्रत्ययघटित शब्द

(3) सामासिक शब्द (4) अभ्यस्त शब्द

34. जा, ये, कर, बस, बोल, पी यासारख्या मूळ धातुंना काय म्हणतात ?

(1) सिद्ध शब्द (2) साधित शब्द (3) उपसर्गघटित (4) प्रत्ययघटित

35. पुढील पर्यायातून शुद्ध शब्द ओळखा.

(1) मिस्कील (2) मिश्किल (3) मिश्कील (4) मिष्किल

36. पुढील वाक्यातून 'केवल वाक्य' शोधा -

(1) मला ताप आला आहे. मी शाळेत जाणार नाही.

(2) मला ताप आल्यामुळे मी शाळेस जाणार नाही.

(3) मला ताप आला आहे, म्हणून मी शाळेस जाणार नाही.

(4) मी शाळेस जाणार नाही, कारण मला ताप आहे.

37. पुढीलपैकी तत्सम शब्द ओळखा :

(1) वृक्ष (2) घर (3) गाव (4) काम

38. पुढील वाक्याचा प्रकार ओळखा :

जे चकाकते ते सोने नसते -

(1) केवल वाक्य (2) मिश्र वाक्य (3) संयुक्त वाक्य (4) प्रधान वाक्य

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



39. 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे' या वाक्यातील प्रयोग ओळखा :

(1) अकर्मक भावे प्रयोग (2) सकर्मक भावे प्रयोग
(3) भावकर्तरी प्रयोग (4) संकर प्रयोग

40. पुढील पर्यायातून अचूक शब्द लिहा.

(1) साहाय्यक (2) साह्यक (3) सहायक (4) सहाय्यक

41. खालील विधानातील क्रियाविशेषणाचा प्रकार ओळखा :

'तो इतका मोठ्याने बोलला, की त्याचा आवाज बसला'

(1) उद्देशदर्शक (2) कारणदर्शक (3) रीतिदर्शक (4) कालदर्शक

42. शेजारी पाजारी, उरला सुरला, बारीक सारीक, हे शब्द शब्दांच्या कोणत्या प्रकारात मोडतात ?

(1) पूर्णाभ्यस्त शब्द (2) अंशाभ्यस्त शब्द (3) अनुकरण वाचक (4) यापैकी नाही

43. 'घोडा' या शब्दाचे योग्य सामान्यरूप कोणते ?

(1) घोड (2) घोडे (3) घोड्याला (4) घोडी

44. खालील साधित शब्दाचा प्रकार ओळखा :

'प्रतिक्रिया'

(1) प्रत्ययघटित शब्द (2) उपसर्गघटित शब्द
(3) सामासिक शब्द (4) अभ्यस्त शब्द

45. 'त्याची गोष्ट लिहून झाली' या विधानातील प्रयोग ओळखा :

(1) समापन कर्मणी (2) नवीन कर्मणी (3) पुराण कर्मणी (4) शक्य कर्मणी

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



46. 'हत्ती' या शब्दाला समानार्थी शब्द निवडा :

(1) रवी (2) मधुप (3) सारंग (4) नंदन

47. 'भारूड' हा रचनाप्रकार कोणी रूढ केला ?

(1) संत ज्ञानेश्वर (2) संत तुकाराम (3) संत एकनाथ (4) संत जनाबाई

48. (i) पतंग झाडावर अडकला होता.

(ii) पतंग वर जात होता.

(a) विधान नं. (i) शब्दयोगी अव्ययाचे उदाहरण आहे.

(b) विधान नं. (i) क्रियाविशेषण अव्ययाचे उदाहरण आहे.

(c) विधान नं. (ii) क्रियाविशेषण अव्ययाचे उदाहरण आहे.

(d) विधान नं. (ii) शब्दयोगी अव्ययाचे उदाहरण आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (d) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (a) व (c) बरोबर (4) फक्त (d) चूक

49. पुढील शब्दसिद्धीचा प्रकार ओळखा –

'धडपड'

(1) पूर्णाभ्यस्त (2) अंशाभ्यस्त

(3) अनुकरणवाचक (4) यापैकी कोणताही नाही

50. 'त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला' या वाक्यातील उद्देश्य ओळखा :

(1) मुलगा (2) आज (3) चांगला (4) खेळला

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्रमांक 51 ते 55 ची उत्तरे द्या.**

स्वररचना बांधणे हे जर काल्पनिक सर्जनाचे उदाहरण असेल, तर स्वररचना ही कल्पनाजन्य चीज ठरेल आणि हीच गोष्ट एखादी कविता, एखादे चित्र किंवा एखादी अन्य कलाकृती यांनाही लागू आहे. पण हा विरोधाभासच वाटतो. स्वररचना ही काल्पनिक चीज नसून खरीखुरी गोष्ट असते, तो एक खराखुरा नादसमूह असतो चित्र खऱ्याखुऱ्या रंगांनी रंगविलेले आणि खऱ्याखुऱ्या फलकावर रेखाटलेले असते, आणि याचप्रमाणे तत्सम इतर गोष्टी असतात, असे मानण्याकडे साहजिकच आपला कल होतो. आणि वाचक जर का थोडा धीर धरतील, तर येथे कसलाही विरोधाभास नाही, हे दाखवून देण्याची आशा मला आहे. कलाकृतीसंबंधी वास्तविक आपण जे काही म्हणत असतो, तेच या उभय विधानांतून व्यक्त होत असते आणि त्यांचा संबंध भिन्न वस्तूंशी असल्यामुळे ती परस्परविरोधी मुळीच ठरत नाहीत, हेही दाखवून देण्याचा माझा मानस आहे.

आपण जेव्हा कलाकृतीसंबंधी (स्वररचना, चित्र इत्यादी) बोलत असतो, तेव्हा ती कला म्हणजे एक खास प्रकारची कारागिरी असा आपला अर्थ असतो. श्रोत्यांच्या मनात विशिष्ट भावनिक परिणाम उत्पन्न करण्यासाठी ती कारागिरी चेतक म्हणून सहेतुकपणे योजिलेली असते. 'कलाकृती' या संज्ञेने जिला आपण खरीखुरी वस्तू म्हणू, अशी गोष्टच निर्दिष्ट करण्याचा आपला नक्की हेतू असतो. कलावंत हा एखाद्या जादुगारासारखा किंवा करमणूक पुरविणाऱ्या ठेकेदारासारखा अनिवार्यपणे कारागीर असतोच. तो कोणत्या तरी द्रव्यातून काही एका पूर्वयोजनेनुसार वस्तूंचीच निर्मिती करणारा एक कारागीर असतो. एखाद्या अभियंत्याच्या कृतींप्रमाणे त्याच्याही कृती खऱ्याखुऱ्या असतात आणि दोघांच्याही कृतींमागील कारणही एकच असते.

परंतु खऱ्या कलावंताबाबत हेच लागू होते, असा निष्कर्ष यातून ओघाने मुळीच निघणार नाही. श्रोत्यांच्या मनावर भावनिक परिणाम घडवून आणणे, हेच त्यांचे कार्य नसते. उदाहरणार्थ, फक्त स्वररचनेची घडण करणे एवढेच त्याचे कार्य असते. सदर स्वररचनेचे अस्तित्व जेव्हा त्याच्या डोक्यात असते, तेव्हा अगोदरच म्हणजे काल्पनिक स्वरूपात ती स्वररचना परिपूर्ण आणि संपूर्ण सिद्ध झालेलीच असते. नंतर श्रोत्यांसमोर सादर करण्याची व्यवस्था तो कलावंत करील. आता एक नादसमूह हा एक खरीखुरी स्वररचना म्हणून अस्तित्वात आलेला असतो. पण या दोहोंपैकी प्रत्यक्ष कलाकृती कोणती? त्यांच्यापैकी संगीत नेमके कोणते? आपण जे आधीच सांगितले आहे, त्यात याचे उत्तर ध्वनित आहेच : कलाकृतिरूप संगीत म्हणजे तो नादसमूह नव्हे; तर रचनाकाराच्या डोक्यातील स्वररचना हेच खरे संगीत होय; सादरकर्त्याकडून निर्माण होणारा आणि श्रोत्यांकडून ऐकला जाणारा ध्वनिसमूह मुळी संगीत नव्हेच. असे ध्वनिसमूह फक्त साधने होत. ते अक्कलहुशारीने (एरव्ही नव्हे) ऐकल्यासच रचनाकाराच्या डोक्यात असलेल्या काल्पनिक ध्वनिसमूहाची पुनर्रचना श्रोत्यांना करता येणे शक्य असते.

---

**51.** 'खरे संगीत' कोणते?

(1) सादर कर्त्याकडून निर्माण होणारा ध्वनिसमूह

(2) रचनाकाराच्या डोक्यातील स्वररचना

(3) श्रोत्यांकडून ऐकला जाणारा ध्वनिसमूह

(4) केवळ नादसमूह

---

**52.** रचनाकाराच्या डोक्यात असलेल्या काल्पनिक ध्वनिसमूहाची पुनर्रचना श्रोत्यांना करता येणे कसे शक्य असते?

(1) नुसत्या वाचनाने (2) अवलोकनाने (3) श्रवण कौशल्याने (4) ऊहापोहाने

---

**53.** लेखकाच्या मते 'स्वररचना' म्हणजे काय?

(1) काल्पनिक चीज (2) विरोधाभास (3) नादसमूह (4) आभास

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

P.T.O.

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



54. लेखकाच्या मते कारागीर आणि अभियंता यांच्या कृती कशा असतात ?
(1) विरोधी (2) विसंगत (3) एकमेकांपेक्षा भिन्न (4) समान

55. या उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.
(1) स्वररचना (2) काल्पनिक सर्जन
(3) कारागिरी (4) कलाकृती : एक काल्पनिक वस्तू

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 56 ते 60 ची उत्तरे लिहा.**

पशू बदलत नाहीत. त्यांची निवासस्थाने, जीवनशैली आणि भाषा या गोष्टी बदलत नाहीत. अनेक माणसांनाही असे न बदलणे सोयीचे म्हणून प्रिय ठरते. ही माणसे मग परिवर्तनापुढे संकटांचे डोंगर उभे करतात. या डोंगरांना नष्ट करीतच परिवर्तनवाद्यांना माणुसकीची वाट निर्माण करावी लागते. हे परिवर्तनवादी लोक परिवर्तनाला प्रतिष्ठा देतात. गती देतात. परिवर्तन रोखणाऱ्या विकृतींशी त्यांना सतत झगडावे लागते. स्वत:च परिवर्तन व्हावे लागते आणि परिवर्तन जन्माला घालावे लागते. परिवर्तन ही स्वत:च एक संस्कृती असते. जीवन नवनव्याने निर्माण करणाऱ्या प्रयोगाचेच ते वर्णन असते. साहित्याने या प्रयोगाचा हात सोडायचा नसतो. जीवनाने परिवर्तनाला दीपस्तंभ मानायचे असते. परिवर्तनाला पारखे होणारे जीवन निर्जीव होते आणि परिवर्तनाच्या मुखाने बोलणे नाकारणारे साहित्यही मुके होते.

अर्थात आजवर परिवर्तनवाद्यांनी जीवनाचाही आणि साहित्याचाही प्रवाह आटू दिला नाही. जहरी फॅसिझमशी झगडत भांडत त्यांनी मानवाच्या मुक्तीची महाकाव्ये जन्माला घातली. मानवी न्यायाचा विजय साजरी करणारी वाङ्मयीन महत्तेची शिखरे उभारली. विषमतेच्या काळ्या साम्राज्याविरुद्ध निर्वाणीचे संग्राम पेटवले. सूर्यकुलाचा वारसा समृद्ध केला.

परिवर्तनाच्या मूल्यांशी फारकत घेणारे आणि माणुसकीच्या प्रस्थापनेकडे पाठ फिरविणारे लोक कलावादी होतात. फॅसिस्ट, तटस्थ आणि विद्रोही असे तीनच प्रकारचे लोक असतात आणि असे तीनच प्रकारचे लोक साहित्यिकही असतात. कलावादी समीक्षक हे पहिल्या दोन प्रकारच्या लोकांचे आणि लेखकांचे प्रवक्ते असतात. हे लोक, हे लेखक आणि हे समीक्षक प्रतिगाम्यांना अतोनात प्रिय असतात. तिसऱ्या प्रकारचे म्हणजे विद्रोही लेखक शोषणाच्या विरोधात संघर्षात उभे राहतात. हे लेखक, त्यांचे समीक्षक आणि त्यांचे वाचक हे परिवर्तनाचे प्रवक्ते असतात. त्यामुळेच प्रतिगाम्यांना ते आपले अत्यंत स्पष्ट आणि सख्खे शत्रू वाटत असतात.

शेवटी या सर्वच व्यवहारातील वरील सर्वच घटकांचे मानसशास्त्र डोके ठिकाणावर ठेवून मूलभूत पातळीवरून तपासून पाहावे लागते. ते प्रतिगाम्यांच्या तळ्यात आपली कमळे फुलवितात की परिवर्तनाच्या मळ्यात आपली माणुसकी फुलवितात हे पाहणे आवश्यक असते. इतरांसोबतच लेखकांच्या विचारांना आणि भावनांनाही एक वर्गचारित्र्य असतेच. खरी परिवर्तनवादी वाङ्मयीन अभिरुची प्रथम हे वर्गचारित्र्य अधोरेखित करते. लेखकाच्या शब्दांची भूमिका त्याशिवाय लक्षातच येत नाही. लेखकाचा शब्द आपल्याकडे मृत्यू घेऊन येतो आहे की जीवन घेऊन येतो आहे ते कळत नाही. आपण वाचतो तो शब्द शत्रू आहे की मित्र आहे ते कळत नाही. परिवर्तनवादी वाङ्मयीन अभिरुची प्रथम शब्दामागच्या लेखकाची निश्चिती करते. त्यामुळे ती अभिव्यक्तीच्या मोहक चकव्यांना भुलत नाही आणि विंचवांची माळ गळ्यात घालत नाही.

आपल्याकडे अशा विंचवांच्या माळा गळ्यात घालणारे खूप असले तरी कपटी लोकांची कारस्थाने ओळखणारे जागते पहारेही पुष्कळच आहेत. परिवर्तनानेच त्यांना हा उदंड डोळसपणा दिलेला असतो. कारण परिवर्तन म्हणजे शोषणविहीन जीवनाची मूल्ये! परिवर्तन म्हणजे मानवी जीवनाच्या निर्मितीची चिरंतन प्रयोगशाळाच असते.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



56. पुढीलपैकी कोणते कार्य कलावादी लोक करतात ?
(1) मानव मुक्तीचा लढा उभारणे
(2) परिवर्तन मूल्य व माणुसकीला विरोध करणे
(3) मानवी न्यायासाठी वाङ्मयनिर्मिती करणे
(4) विषमतेला विरोध करणे

57. खालील विधाने वाचा व योग्य तो पर्याय निवडा.
(a) परिवर्तनवादी लोक माणुसकीची वाट निर्माण करतात.
(b) परिवर्तनवादी लोकांना स्वत:च परिवर्तन होऊन परिवर्तन जन्माला घालावे लागते.

**पर्यायी उत्तरे :**
(1) (a) व (b) दोन्ही बरोबर
(2) (a) व (b) दोन्ही चूक
(3) (a) बरोबर व (b) चूक
(4) (a) चूक व (b) बरोबर

58. खालील दोन विधाने वाचा व अचूक पर्याय निवडा.
(a) परिवर्तन अप्रिय असणारी माणसे पशूवत असतात.
(b) पशूवत माणसे परिवर्तनाला विरोध करत नाहीत.

**पर्यायी उत्तरे :**
(1) दोन्ही चूक
(2) दोन्ही बरोबर
(3) (a) बरोबर (b) चूक
(4) (a) चूक (b) बरोबर

59. परिवर्तनाने कोणाला डोळसपणा दिला ?
(1) अभिव्यक्तीच्या मोहक चकव्यांना भुलणाऱ्यांना
(2) विंचवाची माळ गळ्यात घालणाऱ्यांना
(3) कपटी लोकांची कारस्थाने ओळखणाऱ्यांना
(4) समाजातील प्रतिगामी लोकांना

60. लेखकाच्या मते परिवर्तनाचा प्रवक्ता कोण नसतो ?
(1) विद्रोही लेखक (2) विद्रोही समीक्षक (3) विद्रोही वाचक (4) कलावादी समीक्षक

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



61. (a) The dead body was taken to the symmetry for burial.

(b) The building looks exquisite only because of its remarkable cemetry.

Pick out the correct sentence :

(1) (a) is correct only (2) (b) is correct only

(3) Both (a) and (b) are correct (4) Both (a) and (b) are incorrect

---

62. (a) Man proposes, but God disposes.

(b) I opened the book, and began to read it.

(c) Though Tuntun was fat, she danced well.

(d) There lived a great prince who was rich and powerful.

Pick out the complex sentence :

**Answer Options :**

(1) (a) and (d) only (2) (b) and (c) only

(3) (c) and (d) only (4) (a) and (b) only

---

63. Which of the given options carries the meaning of the underlined idiom ?

Rejecting the entire proposal will be <u>throwing the baby with the bathwater</u>.

(1) giving the baby a bath (2) removing any chance of contamination

(3) letting a lot of essential things go (4) wasting a lot of resources

---

64. Fill the blank with the most appropriate of the words given below :

The teacher marked the student's ________ in the attendance register.

(1) presenty (2) presentee (3) presence (4) present

---

65. Fill the blank with the most appropriate word from the ones given below :

The ________ of the fire reached up to the roof.

(1) flair (2) flear (3) flayer (4) flare

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



66. Identify the group of words spelt correctly :

(1) chansellor, passanger, announcer, sculptor

(2) audience, dependence, convenience, violence

(3) acusation, asimilation, persuasion, dimension

(4) precision, endurence, repentence, tolerance

---

67. Which of the given options carries the meaning of the underlined idiom ?

In the party last evening, our friend was <u>as high as a kite</u>.

(1) very drunk (2) very excited (3) very jovial (4) very flirtatious

---

68. Politicians generally follow <u>a fabian policy</u> in order to keep everyone satisfied.

Choose the correct meaning of the underlined part.

(1) policy of delaying decisions (2) policy of quick decisions

(3) policy of favourable decisions (4) policy of fair decisions

---

69. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Lapidist | (i) | One who acts against religion |
| (b) | Snob | (ii) | One who eats everything |
| (c) | Omnivorous | (iii) | A person who is careful of a social status |
| (d) | Heretic | (iv) | One who cuts precious stones |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



70. Pick out the correct alternative to complete the sentence given below :

I know the man __________.

(1) that was here yesterday (2) who was here yesterday
(3) if he was here yesterday (4) which was here yesterday

71. He liked the pungent sauce prepared by his mother.

Choose the correct antonym for the word underlined.

(1) gentle (2) mild (3) insipid (4) unsavoury

72. What do the underlined words below respectively mean ?

The pitcher is quite attractive.

The team has a new pitcher.

(1) Earthen pot and baseball player
(2) Movie and basketball player
(3) Earthen pot and basketball player
(4) Movie and baseball player

73. Identify the underlined term :

Now is the time when you should step forward.

(1) Noun clause (2) Adjectival clause
(3) Adverbial clause (4) Noun Phrase

74. Nobody agreed with him because his arguments were beside the mark.

Identify the correct meaning of the underlined part.

(1) irresponsible (2) impossible (3) incomprehensible (4) irrelevant

75. Divide this property __________ Alec, Charles and Jane.

Pick out the correct alternative to complete the sentence.

(1) between (2) in (3) among (4) into

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



76. (a) He went through the <u>content</u> of the letter.

(b) He went through the <u>contents</u> of the letter.

Identify the correct sentence :

(1) Only (a) is correct (2) Only (b) is correct

(3) Both (a) and (b) are correct (4) Both (a) and (b) are incorrect

77. As far as Globalization is concerned, all the Commonwealth-Countries are sailing in the same boat.

It means :

(1) All the Commonwealth Countries have the same facilities

(2) All the Commonwealth Countries have the same predicament

(3) All the Commonwealth Countries have the same amenities

(4) All of these

78. We should not <u>despise</u> anyone for his poverty.

Identify the correct meaning of the word underlined.

(1) scold (2) scorn (3) harm (4) punish

79. The antonym of misanthrope is ________.

(1) loveless (2) lovely (3) loving (4) loveable

80. Point out the correct sentence :

(1) We shall discuss the problem tomorrow.

(2) We shall discuss on the problem tomorrow.

(3) We shall discuss the problem on tomorrow.

(4) We shall discuss about the problem tomorrow.

81. A person who strongly believes in the existence of God in this universe is :

(1) atheist (2) existentialist (3) theist (4) agnostic

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



82. Identify the sentence given below :

It's well within my ability to help him.

(1) Simple (2) Compound (3) Complex (4) Compound-Complex

83. Which of the following sentences are **correct** ?

(a) The tallest of the players was injured.

(b) The man incharge of the workers was called Rajan.

(c) Ram as well as Shyam were present.

(d) The manager, along with several assistants, was present at the ceremony.

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) are correct

(2) Only (b) and (c) are correct

(3) Only (a) and (c) are correct

(4) Only (a), (b) and (d) are correct

84. Change the degree of comparison of the sentence given below :

This is the ideal solution to the problem.

(a) This the most ideal solution to the problem.

(b) This is the idealest solution to the problem.

(c) This solution to the problem is more ideal than all others.

(d) This solution to the problem is idealer than all others.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c) are right (2) Only (b) and (d) are right

(3) All are right (4) None is right

85. Rewrite the sentence below using the word 'walking' :

As they walked on the shore, they could hear the surf.

(a) They could hear the surf in walking on the shore.

(b) While walking on the shore, they could hear the surf.

(c) They could hear the surf walking on the shore.

(d) During walking on the shore they could hear the surf.

**Answer Options :**

(1) Only (a) is correct (2) Only (b) is correct

(3) Only (c) is correct (4) Only (d) is correct

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



86. Punctuate the following to make a meaningful sentence :

She told themhesaidwhy we didn't want to leave early.

(1) She told them, "He said why we didn't want to leave early."

(2) She told them, "He said why we didn't want to leave early !"

(3) She told them he said, "Why we didn't want to leave early ?"

(4) "She told them," he said, "why we didn't want to leave early."

---

87. Which of the following sentences are grammatically correct ?

(a) I suggest that he be allowed to sit for the paper.

(b) Had he my opportunity, he would have minted gold.

(c) Turn.

(d) If she was beautiful, she would have gone on stage.

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (c) and (d)

(3) Only (a), (b) and (c) (4) All correct

---

88. Choose the most appropriate antonym for the underlined word from the options given below :

The organization is known for its <u>probity</u>.

(1) weakness (2) dullness (3) wealth (4) dishonesty

---

89. Fill the blank space with a suitable term to make the most acceptable statement :

I now ________ the chief guest to address the audience.

(1) call in (2) call upon (3) call over (4) call at

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**90.** Identify the grammatically **correct** sentence/s :

(a) None of the brothers has their father's talents.

(b) None of the brothers have their father's talents.

(c) None of the brothers had their father's talents.

(d) None of the brother's had their father's talents.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c) correct (2) Only (b) and (d) correct

(3) Only (a), (b) and (c) are correct (4) All correct

---

**Directions for question numbers 91 to 95 :**

Read the passage below and answer the questions that follow :

I am not a man of letters, and I am not prepared to say that the many years I have spent in gaol have been the sweetest in my life, but I must say that reading and writing have helped me wonderfully to get through them. I am not a literary man, and I am not a historian ; what, indeed, am I ? I find it difficult to answer that question. I have been a dabbler in many things ; I began with science at college and then took to the law, and after developing various other interests in life, finally adopted the popular and widely practised profession of gaol-going in India !

You must not take what I have written in these letters as the final authority on any subject. A politician wants to have a say on every subject, and he always pretends to know much more than he actually does. He has to be watched carefully ! These letters of mine are but superficial sketches joined together by a thin thread. I have rambled on, skipping centuries and many important happenings, and then pitching my tent for quite a long time on some event which interested me. As you will notice, my likes and dislikes are pretty obvious, and so also sometimes are my moods in gaol. I do not want you to take all this for granted ; there may, indeed, be many errors in my accounts. A prison, with no libraries or reference books at hand, is not the most suitable place in which to write on historical subjects. I have had to rely very largely on the many note-books which I have accumulated since I began my visits to gaol twelve years ago. Many books have also come to me here ; they have come and gone, for I could not collect a library here. I have shamelessly taken from these books facts and ideas ; there is nothing original in what I have written.

---

**91.** The author of this passage has made a modest attempt :

(1) to delimit his knowledge and writing

(2) to exaggerate his writing wistfully

(3) to undermine his writing unwittingly

(4) to evaluate his writing objectively

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



92. This passage shows the author as a frank and self-criticizing :

(1) literary man (2) historian (3) politician (4) prisoner

93. This passage clearly shows that the author has :

(1) philosophic and historic sense

(2) literary and philosophic sense

(3) political awareness and philosophic tone

(4) historic and literary sense

94. It seems that the creative urge has made the author active even in the midst of :

(1) the political life (2) the prison life

(3) the public life (4) the college life

95. The author does not claim to be an accomplished :

(1) politician (2) historian (3) prisoner (4) literary man

**Directions for question numbers 96 to 100 :**

Read the passage below and answer the questions that follow :

It is not as if human nature changes. Just as the hand that held the hand axe was the same shape as the hand that holds the mouse, so people always have and always will seek food, desire sex, care for off-spring, compete for status and avoid pain just like any other animal. Many of the idiosyncrasies of the human species are unchanging too. You can travel to the farthest corner of the earth and still expect to encounter singing, smiling, speech, sexual jealousy and a sense of humour–none of which you would find to be the same in a chimpanzee. You could travel back in time and empathise easily with the motives of Shakespeare, Homer, Confucius and the Buddha. If I could meet the man who painted exquisite images of rhinos on the wall of the Chauvet Cave in southern France 32,000 years ago, I have no doubt that I would find him fully human in every psychological way. There is a great deal of human life that does not change.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

P.T.O.

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



Yet, to say that human life is the same as it was 32,000 years ago would be absurd. In that time my species has multiplied 100,000 percent, from perhaps three million to nearly 7 billion people. It has given itself comforts and luxuries to a level that no other species can even imagine. It has colonized every habitable corner of the planet and explored almost every uninhabitable one. It has altered the appearance, the genetics and the chemistry of the world and pinched perhaps 23 percent of the productivity of all the land planets for its own purposes. It has surrounded itself with peculiar, non-random arrangement of atoms called technologies, which it invents, re-invents and discards almost continuously. This is not true for other creatures, not even brainy ones like chimpanzees, bottlenose dolphins, parrots and octopi. They may occasionally use tools, they may occasionally shift their ecological niche, but they do not 'raise their standard of living', or experience 'economic growth'. They do not encounter 'poverty' either.

---

96. Identify the incorrect statement for completing the sentence :

As compared to 32,000 years ago human life has changed in the following aspects :

(1) population has grown exponentially

(2) every habitable corner of the planet has been colonized

(3) every uninhabitable corner of the planet has been explored

(4) humans have modified the genetic compositions of other living things

---

97. The images of rhinos on the wall of the Chauvet Cave indicate that ________.

(1) the writer hopes to meet the artist

(2) France was an important centre of art

(3) man had evolved fully psychologically

(4) human beings were not afraid of rhinos

---

98. Technologies, the writer says, are ________.

(1) the peculiarities surrounding us

(2) non-random arrangement of atoms

(3) inventions and re-inventions

(4) continuous discards

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



99. The writer says that Shakespeare, Homer, Confucius and the Buddha ________.

(1) can be met by travelling back in time

(2) are easy to understand

(3) had the same motives

(4) talked of the same human impulses

---

100. According to the passage, the common factors among human beings and other animals are ________.

(a) desire for sex

(b) singing

(c) competition for status

(d) sense of humour

**Answer Options :**

(1) Only (a) and (b)    (2) Only (c) and (d)

(3) Only (a) and (c)    (4) All four

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER